# ४ राष्ट्रीय उत्पन्न (National Income)

## राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थ :-

1) **राष्ट्रीय उत्पन्न समितीनुसार :-**
"राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एखाद्या विशिष्ट कालखंडात निर्माण करण्यात आलेल्या वस्तू व सेवांचे दुहेरी मोजमाप न होवू देता केलेले मापन होय."

2) **डॉ. मार्शलच्या मते :-**
"देशातील श्रम, भांडवल, नैसर्गिक साधनाच्या मदतीने एका वर्षात ज्या भौतिक व अभौतिक वस्तूची भर टाकतात त्यास राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात."

3) **प्रा. पिगू :-**
"जे उत्पन्न पैशाच्या साह्याने मोजले जाते त्यास राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात."

4) **प्रा. फिशर :-**
"विशिष्ट काळातील देशातील एकुण उपभोगाची बेरीज."

## राष्ट्रीय उत्पन्नाचे वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय उत्पन्न ही स्थूल संकल्पना आहे.
- राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थव्यवस्थेत प्रवाह असतो.
- आर्थिक वर्षात राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते.
- राष्ट्रीय उत्पन्नात घटक खर्च व बाजार किमतीचे मापन केले जाते.
- भांडवली वस्तूचा घसारा वजा केला जातो.
- दुहेरी मोजमाप टाळून राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी होते.

| उत्पादन पद्धत<br>GDP = G&S-IC | उत्पन्न पद्धत<br>GDI=R+W+I+P | खर्च पद्धत<br>GDP= C+I+G+(X-M)+(R-P) |
|---|---|---|
| प्रत्यक्ष व मूल्यावर्धित पद्धत<br>IC - Intermediate Consumption<br>देशातील एकुण खर्चाचा समावेश<br>अंतिम वस्तू व सेवांचे मापन | अप्रत्यक्ष व उत्पन्नाधारित पद्धत<br>Transpfer Payment-हस्तांतरित उत्पन्न वजा केले जाते उत्पादन घटकाच्या मोबदल/उत्पन्नाचे मापन<br>(खंड, वेतन, व्याज, नफा)<br>विभाजनावर आधारित पद्धत. | अप्रत्यक्ष व उपभोगाधारित पद्धत<br>मध्य वस्तू वजा केली जाते.<br>एकुण उपभोगाचे मापन<br>एकुण उपभोगामध्ये कौटुंबिक उपभोग, गुंतवणुक, शासनाचा खर्च, आयात खर्च इत्यादींचा समावेश होतो.<br>ही पद्धत भारतात वापरली जात नाही. |

## राष्ट्रीय उत्पन्न मापनाची पार्श्वभूमी :-

- भारतात सर्वप्रभम राष्ट्रीय उत्पनन मापनाचा प्रयत्न भारतीय अर्थशास्त्राचे जनक **दादाभाई नौरोजी** यांनी केला. 1867-68 मध्ये '
  **Poverty and un-British rule in India - 1901'**
  या पुस्तकात राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना मांडली.
  त्यांच्या मते, - 1867 - मध्ये भारताचे राष्ट्रीय उत्पन्न **340 कोटी** होते. (अर्थव्यवस्थेचे क्षेत्र - कृषी व गैरकृषी)
  - दरडोई उत्पन्न (Per Capita Income - PCI) **20 रु.** वार्षिक इतका होते.
  - **विल्यम डिग्बी** यांच्या मते 1897-98 मध्ये भारताचे राष्ट्रीय उत्पन्न **390 कोटी** तर **17 रु** दरडोई उत्पन्न.

- पुढे 1911 **फिंडले शिरास** यांच्या मते भारतीय लोकांचे दरडोई उत्पन्न **49 रु.** होते.

- 1931-32 - **व्ही.के.आर.व्ही. राव** यांनी सर्वप्रथम वैज्ञानिक पद्धतीचा वापर करुन राष्ट्रीय उत्पन्न मोजले. यासाठी लोकलेखा प्रणाली विकसित केली. राव हे लोकलेखा प्रणालीचे जनक होते. त्यांच्या मते, 1931-32 मध्ये राष्ट्रीय उत्पन्न **1684 कोटी रु.** होते. तर दरडोई उत्पन्न **62 रु.** होते. (1925-1929 या काळात भारताचे राष्ट्रीय उत्पन्न 2301 कोटी इतके होते तर दरडोई उत्पन्न 78 होते.)

- 1913-14 - मध्ये **वाडिया आणि जोशी** यांच्यामते दरडोई उत्पन्न 44.30 रु.

- **आर.सी. देसाई** - 1930-31 मध्ये भारताचे राष्ट्रीय उत्पन्न 2809 कोटी रुपये होते तर दरडोई उत्पन्न 72 रु होते.

- **राष्ट्रीय उत्पन्न समिती :- स्थापन वर्ष 4 ऑगस्ट, 1949 - अध्यक्ष पी.सी. महालनोबिस.**
  सदस्य - डी.आर. गाडगिळ व व्ही.के.आर.व्ही. राव हे होते.

- 1954 - केंद्रीय साख्यिकीय संस्थेची स्थापना
  (CSO - Central Stalistical Organision)

- CSO ला मदत करण्यासाठी NSSO (National Sample Survery Office) काम करते.
  - एप्रिल, 1955 मध्ये CSO चे प्रत्यक्ष कार्य सुरु झाले.

- सध्या राष्ट्रीय उत्पन्न मापनासाठी आधार वर्ष - 2011-12

- 1 जून, 2005 रोजी **केंद्रीय सांख्यिकीय आयोगाची स्थापना, (NSC)**
  12 जुलै, 2006 - प्रत्यक्ष कार्यभार. (शिफारस जाने 2000 - सी.रंगराजन समिती)



## राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना

### GDP - Gross Domestic Product (स्थुल देशांतर्गत उत्पादन)

- "एका आर्थिक वर्षात देशात उत्पादित होणाऱ्या अंतिम वस्तू व सेवा यांचे बाजार मूल्य म्हणजे GDP होय."

***सुत्र : उत्पादन पद्धतीला मोजाताना.***

**GDP = G & S - IC**

**उत्पन्न पद्धतीला मोजताना -** **GDI = R+W+I+P**

**बाजार किंमतीला मोजाताना -**

$$GDP_{(MP)} = GDP_{(FC)} + \text{Indirect Taxes} + \text{Subsidies}$$

**घटक खर्चाला मापन करताना -**

$$GDP_{(FC)} = GDP_{(MP)} - \text{Indirect Taxes} + \text{Subsidies}$$

**GDP = NDP + Depreciation**

**GDP = GNP - Net Income from abord**

### वैशिष्ट्ये

- आर्थिक वर्षामध्ये मापन **(1 एप्रिल ते 31 मार्च)**
- देशांतर्गत उत्पादनाचा समावेश.
- अंतिम वस्तू व सेवांचे बाजारमूल्य मोजले जाते.
- सिमेरेषेतील उत्पादनाचा समावेश होतो.
- भौगोलिक क्षेत्राचा समावेश होतो.
- घसारा वजा न करता उत्पादन मोजले जाते.
- निवासी व्यक्तीने घेतलेल्या उत्पादनाचा समावेश होतो.
- परकीय उत्पन्नाचा समावेश GDP मध्ये होत नाही.
- देशातील व्यक्तीचे देशात घेतलेले उत्पादन व परकीय व्यक्तीने देशात घेतलेले उत्पादन GDP मध्ये समाविष्ट होते.
- GDP मोजाताना बाजार भावाचा विचार केला जातो.
- मध्य खरिदी / वस्तूचे मूल्य वजा केले जाते.

### - Gross National Product (स्थुल राष्ट्रीय उत्पादन)

- "आर्थिक वर्षातील देशांतर्गत व परकीय उत्पन्नाचा समावेश GNP मध्ये होतो."

***सुत्र : उत्पादन पद्धतीला मोजाताना.***

GNP = GDP + (X - M)

GNP = G & S - IC + (X - M)

$GNP_{(MP)} = GNP_{FC}$ + Indirect Taxes + Subsidies

$GNP_{(FC)} = GNP_{(MP)}$ - Indirect Taxes + Subsidies

GNP = NNP + Depreciation (घसारा)

GNP = GDP + Net income from abrod

### वैशिष्ट्ये

- देशातील नागरिकांच्या उत्पन्नाचा समावेश होतो.
- आर्थिक वर्षामध्ये मापन (1 एप्रिल ते 31 मार्च)
- देशांतर्गत उत्पादन (GDP) चा समावेश होतो. तसेच परकीय उत्पन्नाचा समावेश होतो.
- आर्थिक क्षेत्राचा GNP मध्ये समावेश होतो.
- (X-M) परकीय निर्यात-आयातीमधून प्राप्त परकीय उत्पन्न विचारात घेतले जाते. म्हणजेच निव्वळ परकीय उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नात मोजले जाते.
- देशातील नागरिकांनी देशात घेतलेले व देशाबाहेरुन प्राप्त केलेले उत्पन्न समाविष्ट होते.

## NNP - Net National Product (निव्वळ राष्ट्रीय उत्पादन)

- "आर्थिक वर्षातील देशांतर्गत व परकीय उत्पन्नाचा समावेश GNP मध्ये होतो."

*सुत्र : उत्पादन पद्धतीला मोजाताना.*

- "आर्थिक वर्षातील घसारा वजा करुन मोजलेले देशांतर्गत उत्पादन होय."

### वैशिष्ट्ये

- शुद्ध राष्ट्रीय उत्पादन होय.
- स्थुल राष्ट्रीय उत्पादनामधुन घसारा वजा केला जातो.
- NDP पेक्षा NNP चे मूल्य अधिक येते.

**NNP = GNP-Depreciation (घसारा)**

**NNP = NDP + (X - M)**

**बाजार किंमतीला मापन**

**$NNP_{(MP)} = NNP_{(FC)}$ + Indirect taxes + Subsidies**

**घटक खर्चाला मापन**

**$NNP_{(FC)} = NNP_{(MP)}$ - Indirect taxes + Subsidies**

### वैशिष्ट्ये

- शुद्ध देशांतर्गत उत्पादन होय.
- यंत्राची झिज / घसारा वजा केला जातो.
- GDP पेक्षा NDP कमी येतो.
- घसारा - D या अक्षराने दर्शवला जातो.

## NDP - Net Domestic Product (निव्वळ देशांतर्गत उत्पादन)

- "आर्थिक वर्षातील घसारा वजा करुन मोजलेले देशांतर्गत उत्पादन होय."

**NDP = GDP - Depreciation (घसारा)**

**NDP = NNP - (X - M)**

**$NDI_{(Fc)} = NDP_{(MP)}$ - Indirect taxes + Subsidies**

**$NDP_{(MP)} = NDI_{(FC)}$ + Indirect taxes + Subsidies**

## PCI - Per Capita Income (दरडोई उत्पन्न)

- "देशातील एकुण उत्पन्नापैकी प्रत्येक व्यक्तींच्या वाट्याला येणारे उत्पन्न होय."
- $\text{दरडोई उत्पन्न} = \frac{\text{एकुण राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{एकुण लोकसंख्या}}$

### वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय उत्पन्नाला लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न प्राप्त होते.
- लोकसंख्येचा परिणाम दरडोई उत्पन्नावर होतो.
- लोकसंख्या जेवढी जास्त असेल तेवढे दरडोई उत्पन्न कमी येते.
- विकासाच्या आधारावर वर्गीकरण करण्यासाठी दरडोई उत्पन्नाचा आधार घेतला जातो.
- दरडोई उत्पन्नाच्या सहाय्याने राहणीमानाची पातळी कळते.

## DI = Disposable Income (व्ययक्षम उत्पन्न)

**DI = PI - (PT + S)**

## PI - Personal Income (वैयक्तिक उत्पन्न)

- वैयक्तिना प्राप्त होणारे उत्पन्न होय.

**PI = Total Income - Direct Taxes**

### वैशिष्ट्ये

- वेगवेगळ्या माध्यमातुन मिळणारे उत्पन्न वैयक्तिक उत्पन्नात मोजले जाते.
- उदा. बेरोजगारी भत्ता, मनरेगा उत्पन्न, आर्थिक मदत, इत्यादी.
- हे उत्पन्न वैयक्तिक उत्पन्नात मोजले जाते पण राष्ट्रीय उत्पन्नात मोजले जात नाही.
- एकुण उत्पन्नामधून कर व बचत वजा केले असता मिळणारे खर्च शक्य उत्पन्न.

- व्ययक्षम उत्पन्न म्हणजेच खर्च करण्यासाठी वापरण्यात येणारे उत्पन्न होय.
- व्यक्तीगत उत्पन्नापैकी सर्वच उत्पन्न खर्चासाठी वापरता येत नाहीत तर त्यापैकी व्यक्तीगत कर व बचत वजा केली जाते.

**अनुकूल व्यापार**

**X > M = GDP < GNP**

**X > M = NDP < NNP**

**प्रतिकुल व्यापार**

**X < M = GDP > GNP**

**X < M = NDP > NNP**

| | आधार वर्षाची शृंखला | आधार वर्ष |
|---|---|---|
| 1) | पहिली - ऑगस्ट 1952 | 1948-1949 |
| 2) | दुसरी- ऑगस्ट 1967 | 1960-1961 |
| 3) | तिसरी - जाने 1978 | 1970-1971 |
| 4) | चौथी - फेब्रु.1988 | 1980-1981 |
| 5) | पाचवी - फेब्रु.1999 | 1993-1994 |
| 6) | सहावी - जाने.2006 | 1999-2000 |
| 7) | सातवी - सेनगुप्ता 2010 | 2004-2005 |
| 8) | आठवी - के.सुंदरम 2015 | 2011-2012 |
| 9) | नववी - ढोलकीया समिती | 2017-18 |

**नोट :-** जीडीपी आणि औद्योगिक उत्पादन निर्देशांकाच्या आधारभूत वर्षामध्ये बदल करण्यासंदर्भात शिफारशी करण्यासाठी रवींद्र ढोलकिया यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारने समिती स्थापन केली आहे. या समितीनुसार पुढील आधारवर्षाची नववी शृंखला म्हणुन **2017-18** असावी अशी शिफारस करण्यात आली.

## हरित स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Green GNP) :-

**Green GNP = GNP - Dn**

- 1990 च्या दशकात हरित GNP या संकल्पनेचा उदय झाला आहे.
- 2006 साली सर्वप्रथम चीनने या संकल्पनेचा वापर केला आहे. (2004 मध्ये हरित GDP च्या वापरामुळे एकुण GDP मध्ये चीनमध्ये 3% घट निर्देशनास आली म्हणून 2007 पासून चीनने मोजणी बंद केली आहे)
- "पर्यावरणीय ऱ्हास टाकून केलेली उत्पादन वृद्धी म्हणजे हरित GDP होय.
- भारतात हरित GDP चा वापर केम्ब्रीज विद्यापीठाचे अर्थतज्ञ श्री. पार्थ दासगुप्ता यांचा एक कार्यगट नियुक्त करण्यात आला.
- भारतात 2015 पासुन हरित GDP ची मोजणीस सुरुवात केली आहे.
- सर्वप्रथम 1995 मध्ये हरित GNP जागतिक बँकेद्वारे प्रतिबाधन (सुरु) करण्यात आले.
- एका निश्चित कालावधीत नैसर्गिक साधनसामग्री व स्थिर पर्यावरण किंवा सुरक्षित पर्यावरण ठेवून घेतलेले अधिकतम उत्पादन म्हणजे हरित GNP होय.

## शाश्वत / सातत्यपूर्ण निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (Sustainable NNP) :-

- पर्यावरणाचा अतिवापर न करता पर्याप्त वापर करुन घेतलेले उत्पादन म्हणजे शाश्वत निव्वळ राष्ट्रीय उत्पादन होय.

**S-NNP = GNP - Dm - Dn - R - A**

GNP - सखल राष्ट्रीय उत्पादन

Dm - उत्पादित भांडवली संपत्तीचा घसारा / भांडवली वस्तूची झीज

Dn - पर्यावरण ऱ्हासाचे मौद्रिक मूल्य

R - Restore = वने, वन्यसंपत्ती यासारखे पर्यावरणीय भांडवल पूर्ववत करण्यासाठी लागणारा खर्च.

A - Avert = पर्यावरण ऱ्हासावर (पाणी, वायू, जमीन प्रदुषणावर मात करण्यासाठी व परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी लागणारा खर्च)

## विस्फिती (GDP Deflator) :-


$$\text{DP Deflator} = \frac{\text{Nominal GDP}}{\text{Real GDP}} \times 100$$


- भाववाढ निर्देशांकातील बदलाचे गुणक.
- वर्तमान किंमतीचा अंदाज येतो.
- GDP Deflator हा किंमत निर्देशांक नाही पण किमतीतील बदल Deflator च्या सहाय्याने दर्शविला जातो.
- Deflator मोजाताना सर्व वस्तू व सेवांचा समावेश.




## GDP क्षेत्रीय वाटा (%)

| क्र. | क्षेत्र | 1950-51 | 1980-81 | 2013-14 | 2017-18 | 2018-19 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | कृषी व संलग्न (प्राथमिक क्षेत्र) | 55.4 | 38.0 | 13.9 | 17.1 | 18.97 |
| 2. | उद्योग (द्वितीयक क्षेत्र) | 15.0 | 24.0 | 26.2 | 29.1 | 27.03 |
| 3. | सेवा क्षेत्र (तृतीय क्षेत्र) | 29.6 | 38.0 | 59.9 | 53.9 | 54.40 |




### महत्त्वाचे -

**आर्थिक पाहणी अहवाल 2021-22 नुसार भारताचा वृध्दीदर 8.0 ते 8.5 % असेल.**
**IMF च्या मते वर्ष 2022-23 साठी भारताचा वृध्दीदर 8.7 % असेल.**

* **National Statistical Office च्या मते** एप्रिल ते जुन 2020 मध्ये भारताच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनामध्ये (GDP) **23.9%** ने घसरण झाली आहे. हे प्रमाण वर्ष ते वर्ष या आधारावर मोजण्यात आले आहे. तर स्थुल मुल्यावर्धित (GVA) -22.8% आहे.

* **Moodys संस्थेच्या मते,** ग्लोबल मायक्रो आऊटलुक 2021-22 या अहवालानुसार 2022 या वर्षासाठी भारताच्या उत्पादनात -8.9% नी घसरण झाली आहे तर आगामी वर्षासाठी (2021-22) 8.1% ने वाढीचा अंदाज व्यक्त केला आहे.

* **World Bank च्या मते,** 2020 मध्ये भारताच्या उत्पादनात 9.6% नी घट झाली आहे.

* **IMF च्या मते,** 2020 मध्ये भारताच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनात 10.3% नी घसरण झाली आहे.

# GDP चे मापन

## घटक खर्च (Factor Cost)

कोणतीही वस्तू तयार करण्यासाठी येणारा खर्च/ उत्पादन खर्च म्हणजे घटक खर्च होय.

**उत्पादन घटक**

| भूमी | श्रम | भांडवल | संयोजक |
|---|---|---|---|
| खंड | वेतन | व्याज | नफा |

## बाजार किंमत (Market Price)

घटक खर्चामध्ये अप्रत्यक्ष कर व अनुदान समाविष्ट केले असता बाजार किंमत प्राप्त होते.

**बाजार किंमत**

| चालू किंमत Current Price | स्थिर किंमत Constaint Price |
|---|---|
| ↓ | ↓ |
| चालू वर्षातील वस्तू व सेवांच्या किंमती | आधार वर्षातील वस्तू व सेवांच्या किंमती |
| ↓ | ↓ |
| Nominal GDP मौद्रिक उत्पादन | Real GDP वास्तव उत्पादन |

**GDP (MP) = GDP (FC) + ( अप्रत्यक्ष कर + अनुदान)**

**GDP (FC) = GDP (MP) - ( अप्रत्यक्ष कर + अनुदान)**

**GNP (MP) = GNP (FC) + ( अप्रत्यक्ष कर + अनुदान)**

**GNP (FC) = GNP (MP) - ( अप्रत्यक्ष कर + अनुदान)**

### आधार वर्ष 2017-18

| | उत्पादन | नग | किंमत | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. |  | 10 x 100000 | | 10,00,000 |
| 2. |  | 20 x 10000 | | 2,00,000 |
| 3. |  | 1000 x 1 | | 1000 |
| | | Real GDP | | 12,01000 |

### चालू वर्ष 2022-23

| | उत्पादन | नग | किंमत | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. |  | 10 x 110000 | | 11,00,000 |
| 2. |  | 20 x 11000 | | 2,20,000 |
| 3. |  | 1000 x 2 | | 2000 |
| | | Nominal GDP | | 13,22,000 |

| वर्ष | शुध्द राष्ट्रीय उत्पादन (करोड रुपये) | प्रति व्यक्ती उत्पादन (रुपये) | शुध्द राष्ट्रीय उत्पादन (करोड रुपये) | प्रति व्यक्ती उत्पादन (रुपये) |
|---|---|---|---|---|
| 1950 - 51 | 2,04,924 | 5,708 | 9,152 | 255 |
| 1960 - 61 | 3,09,045 | 7,121 | 15,593 | 359 |
| 1970-71 | 4,37,719 | 8,091 | 40,135 | 742 |
| 1980-81 | 5,83,548 | 8,594 | 1,21,129 | 1,784 |
| 1990-91 | 9,67,773 | 11,535 | 4,56,409 | 5,440 |
| 2000-01 | 16,47,903 | 16,172 | 17,00,467 | 16,688 |
| 2001-02 | 17,43,466 | 16,764 | 8,49,360 | 17,782 |
| 2004-05 | 21,04,520 | 19,325 | 25,26,408 | 23,199 |
| **2004-05 की कीमतों पर चालू कीमतों पर** | | | | |
| 2004-05 | 26,23,995 | 24,095 | 26,23,994 | 24,095 |
| 2005-06 | 28,72,212 | 25,969 | 30,06,469 | 27,183 |
| 2006-07 | 31,49,912 | 28,074 | 34,87,172 | 31,080 |
| 2007-08 | 34,49,970 | 30,316 | 40,31,881 | 35,430 |
| 2008-09 | 36,69,890 | 31,801 | 46,85,873 | 40,605 |
| 2009-10 | 89,59,653 | 33,843 | 53,95,688 | 46,117 |
| 2010-11(3R) | 42,93,585 | 36,202 | 64,06,834 | 54,021 |
| 2011-12(2R) | 45,73,328 | 38,048 | 74,34,965 | 61,855 |
| 2012-13(R) | 47,28,776 | 38,856 | 82,55,978 | 67,839 |
| 2013-14(PE) | 49,20,183 | 38,904 | 91,71,045 | 74,380 |

**वृध्दी दरें (Growth Rates)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1950-51 | ते 1960-61 | 4.2 | 2.3 | 5.5 | 3.2 |
| 1960-61 | ते 1970-71 | 3.5 | 1.2 | 9.9 | 7.5 |
| 1970-71 | ते 1980-81 | 2.9 | 0.6 | 11.7 | 9.2 |
| 1980-81 | ते 1990-91 | 5.2 | 3.0 | 14.2 | 11.8 |
| 1990-91 | ते 2000-01 | 5.5 | 3.4 | 14.0 | 11.9 |
| 2000-01 | ते 2004-05 | 7.5 | 5.9 | 12.4 | 10.7 |
| 1950-51 | ते 1980-81 | 3.5 | 1.4 | 9.0 | 6.7 |
| 1980-81 | ते 2000-01 | 5.6 | 3.2 | 14.1 | 11.8 |
| 2000-01 | ते 2004-05 | 6.4 | 4.7 | 10.5 | 3.6 |
| 2004-05 | ते 2013-14 | 7.3 | 5.8 | 14.9 | 13.4 |

### राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या अडचणी

1. हस्तांतरित देणी
2. परकीय कंपन्याचे उत्पन्न
3. विनामूल्य सेवा
4. बेकायदेशिर व्यवहारापासून मिळणारे उत्पन्न
5. सरकारी क्षेत्र
6. स्व-उपभोगासाठीचे उत्पन्न
7. किंमतीतील बदल

### व्यवहारिक अडचणी

1. दुहेरी गणनेची समस्या
2. अमौद्रीक क्षेत्राचे अस्तित्व
3. व्यावसायिक विशेषीकरणाचा अभाव
4. अपुरी आणि अविश्वसनीय सांख्यिकी आकडेवारी
5. भांडवली लाभ/भांडवली तोटा
6. घसारा
7. मालाच्या साठयाचे मूल्य
8. निरक्षरता आणि अज्ञान